MHKO190008332022

## निशाणी क्र.३३ खालील आदेश
## नियमित दिवाणी दावा क्र.२८८/२०२२
*कृष्णात विठोबा सुतार वि. मधुकर गोविंद सुतार व इतर*
## (दिनांकः१४/०८/२०२४)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादींना पुरेशी संधी देवुनही त्यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दिले नाही.

२. वादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीं व तर्फे वकील पुकारले असता गैरहजर. सबब, प्रतिवादींच्या युक्तीवादाशिवाय सदर अर्ज पुढे चालविण्यात आला.

३. वादीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी वाटपासाठी दाखल केलेला आहे. परंतु दाव्यामध्ये नजर चुकीने व अनावधानाने मौजे येळवडे, येथील गट नं.७१० ची मिळकत नमुद करणेची राहुन गेली आहे. सदर मिळकत दाव्यामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी त्यांनी विनंती केली.

४. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणात अद्याप संपरीक्षा सुरू झालेली नाही. वादीने मागीतलेली दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असुन सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट गुणावगुणांवर दाव्याचा अंतिम निर्णय देणेस मदतच होणार आहे. प्रस्तावित दुरूस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुपात अथवा दाव्याच्या कारणांमध्ये कोणताही बदल होत नाही. परिणामी, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**– आदेश –**

१. प्रस्तुत दुरूस्ती अर्ज निशाणी क्र.३३ मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने अर्जात नमुद प्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करुन दुरुस्त दाव्याच्या प्रती अभिलेखावर दाखल कराव्यात.

DILAWAR MAHAMAD GOUS MALIDWALE
Digitally signed by DILAWAR MAHAMAD GOUS MALIDWALE
Date: 2024.08.14 16:26:53 +0530

**(डि.एम.जी.मलिदवाले )**

ठिकाण : राधानगरी
दिनांक :१४/०८/२०२४

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
राधानगरी.